<u>न्यायदंडाधिकारी प्रथव वर्ग, नांदुरा यांच्या न्यायालयात</u>

**नि.फौ.ख.क्र. २१४/२०२०** **निशाणी क्र. २०**

## दोषारोप

मी, म. बा. आसिजा, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा याद्वारे दोषारोप ठेवतो की, तुम्ही –

१) **गणेश दिनकर माळोदे,** वय – २३ वर्ष, धंदा – मजुरी,
रा. दुर्गा नगर, नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

२) **सागर पुरुषोत्तम मु–हे,** वय – ५० वर्ष, धंदा – शेत मजुरी,
रा. निमगांव, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

दिनांक ३१/०३/२०२० रात्री ०८.३० वाजेच्या सुमारास, साईनाथ मेडीकल, निमगांव, ता. नांदुरा, जि. बुलडाणा येथे तुम्ही आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २ सह आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना काठी या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्या अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह वाचन कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

२. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. २ ने आरोपी क्र. १ सह आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना लोटपाट व धक्काबुक्की करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्या अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२३ सह वाचन कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

३. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. १ व २ आपसात संगनमत करुन फिर्यादीला मारहाण करत असतांना फिर्यादी यांचा मोबाईल खिशातुन पडुन फुटल्याने मोबाईलचे नुकसान केले त्या अन्वये तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम ४२७ सह वाचन कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

वरील अपराध माझ्या कार्यक्षेत्रात घडल्याने मी त्याची दखल घेतो

आणि याद्वारे मी असा निर्देश देतो की, उक्त आरोपांबाबत या न्यायालयामार्फत तुमची न्यायचौकशी होईल.

सही/–
नांदुरा **(म.बा. असिजा)**
दिनांक – १४/०२/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

वरील तपशिलातील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगितला, त्यास त्यांनी नकार दिला.

सही/–
नांदुरा **(म.बा. असिजा)**
दिनांक – १४/०२/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

– – – – –